# मुंबई विद्यापीठ

क्र.मा.सं.वि.क/आयसीसी/२०२४-२५/५२९

**परिपत्रक:-**

**संदर्भ :- परिपत्रक क्र. मा.सं.वि.क/आयसीसी/२०२३-२४/९९४,
दिनांक २० डिसेंबर, २०२३**

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/ विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञान स्तोत्र केंद्र, संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, समन्वयक, रत्नागिरी उपपरिसर, समन्वयक, ठाणे उपपरिसर, समन्वयक, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड अप्लाईड सायन्सेस, कल्याण उपकेंद्र, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय परिपत्रकानुसार विद्यापीठातील उपस्थिती अहवाला सोबत अनुपस्थित कर्मचाऱ्यांचे ई-समर्थ प्रणालीव्दारे अग्रेषित केलेले रजेचे अर्ज मानव संसाधन विकास कक्ष येथे सादर करण्याबाबत अवगत करण्यात आले होते. तरी, असे निर्दशनास येते की, सदर उपस्थिती अहवालात गैरहजर असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बाबतीत फक्त अनुपस्थिती/गैरहजर अथवा 0 (शून्य) दिवस असा शेरा आढळून आलेला आहे.

तरी या परिपत्रकाव्दारे विद्यापीठातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, **आपण उपभोगत असलेल्या रजा अथवा रजेचे कारण संबंधित विभाग प्रमुख यांना वेळोवेळी कळविण्यात यावे. जेणेकरून आपल्या उपस्थिती अहवालात त्याची नोंद आपल्या विभागास करता येईल. अन्यथा आपले वेतन रोखण्यात येईल.**

तसेच संबंधित विभागप्रमुखांना कळविण्यात येते की, **आपल्या विभागातील गैरहजर असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बाबत उपस्थिती अहवालात त्यांच्या अनुपस्थितीचे कारण अथवा ते कोणती रजा उपभोगत आहे याचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. अन्यथा सदर अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वेतन रोखण्यात येईल. तसेच आपल्या विभागात कार्यरत असलेल्या सर्व उपस्थित /अनुपस्थिती अधिकारी/ कर्मचाऱ्यांची नावे प्रत्येक महिन्याच्या उपस्थिती अहवालात नमूद असणे आवश्यक आहे. तसेच अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या रजेचे अर्ज सोबत जोडताना त्यावर त्यांचा सेवापुस्तक क्रमांक नमूद करण्यात यावा.**

...२/-

सदर बाब सर्व संबंधित कार्यालय प्रमुख यांनी आपल्या अधिनस्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

भारतीय सौर ०३ आश्विन शके १९४६
२५ सप्टेंबर, २०२४
मुंबई - ४०००३२

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव

प्रति,
विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख,
सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञान स्तोत्र केंद्र,
संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, संचालक, रत्नागिरी उपपरिसर,
संचालक, ठाणे उपपरिसर,
संचालक, सिंधुदुर्ग उपपरिसर, सर्व उपकुलसचिव, स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री,
विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे कक्षांचे प्रमुख

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित -
१. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव,
२. उपकुलसचिव/मुख्य लेखापाल (वित्त व लेखा विभाग)
३. स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ मुद्रणालय.
४. विद्यापीठ अभियंते (फोर्ट परिसर , विद्यानगरी परिसर, रत्नागिरी, ठाणे व सिंधुदुर्ग उपपरिसर)
५. सर्व सहायक कुलसचिव/सहायक कुलसचिव (वित्त व लेखा)
६. सुरक्षा अधिकारी, तसेच सर्व सहायक सुरक्षा अधिकारी.
७. कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख.
८. उद्यान अधिक्षक/अधिक्षक (तांत्रिक) , विधी विभाग
९. स्वीय सहायक (१) कुलगुरु (२) प्र-कुलगुरु(३) प्रभारी कुलसचिव (४) वित्त व लेखा अधिकारी (५) संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ

(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित -
१. सचिव, उ.मा.सा.
२. सचिव, मुंबई युनिवर्सिटी ऑफिसर्स व वेल्फेअर असोसिएशन (मुनोवा)
३. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ.
४. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना.
५. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटना.
६. सचिव, ऑल इंडिया आदिवासी एम्पलॉइज फेडरेशन शाखा मुंबई विद्यापीठ.
७. सचिव, मुंबई विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी मर्या.